अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. १ मार्च २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १५२ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## ईशान किशनवर बीसीसीआयकडून कारवाईची शक्यता



**मुंबई :** भारताचा विकेटकीपर आणि फलंदाज ईशान किशनच्या अडचणी आणखी वाढण्याची शक्यता आहे. आधी भारतीय संघातून बाहेर करण्यात आले त्यानंतर बीसीसीआयच्या वार्षिक करारातून त्याला डच्चू दिला. आता हे सर्व झाल्यानंतर ईशानकडून आणखी एक मोठी चूक झाली. ज्यावर बोर्डाकडून मोठी कारवाई होण्याची शक्यता आहे.भारतीय संघातून बाहेर झाल्यानंतर ईशानला रणजी ट्रॉफी खेळण्यास सांगितले होते. पण त्याने नकार दिला. आता तो डीवाय पाटील टी-२० स्पर्धेत खेळत आहे. बऱ्याच दिवसांनी मैदानावर परतलेल्या ईशानला फार खास प्रभाव पाडता आला नाही. फलंदाजीला आल्यावर ईशानने दोन चांगले शॉट खेळले. पण त्यानंतर सर्वांचे लक्ष गेले ते त्याच्या हेल्मेटकडे होय. ईशानने या सामन्यात खेळताना जे हेल्मेट घातले होते त्यावर बीसीसीआयचा लोगो होता. आता हा बेजबाबदारपणा त्याला अडचणीत आणू शकतो.



# १५ तारखेपासून आचारसंहिता

## ▪ मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांचे सोलापुरात संकेत ▪ वृद्ध-दिव्यांगाना घरबसल्या मतदान

✔ सुराज्य/सोलापूर

**लोकसभेच्या निवडणुकीच्या तारखांची घोषणा १५ मार्चच्या आसपास करण्यात येतील, अशी शक्यता राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी सोलापुरात वर्तवली. निवडणुकीच्या तयारीसंदर्भात सूचना आणि मार्गदर्शन करण्यासाठी ते गुरूवारी येथे आले होते त्यावेळी ते पत्रकारांशी बोलत होते. या आगामी लोकसभा निवडणुकीत पहिल्यांदाच घरी बसून मतदान करता येणार आहे, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी दिली. ते आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.**

आगामी लोकसभा निवडणुकींची आचारसंहिता देशभरात कधींही लागू शकते. त्याआधींच आता राज्य निवडणूक आयोगानं आढावा घेण्यास सुरुवात केली. त्याचं अनुषंगानं राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी सोलापूर जिल्ह्याचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी सांगितलं की, व्हिडिओ रेकॉर्डसह घरी बसून ८० वर्षाच्या वरील नागरिकांना तसेच ४० टक्के पेक्षा जास्त शारीरिक दिवांग्य व्यक्तींना मतदान करता येणार आहे. पोस्टल बॅलेट पद्धतीने हे मतदान करता येणार आहे.यावर्षीपासून निवडणूक आयोगाने हा निर्णय घेतल्याचे श्रीकांत देशपांडे यांनी यावेळी सांगितलं.

जिल्हा प्रशासनाकडून मतदार यादीत नाव असणाऱ्या संबंधित नागरिकांना '१२-ड' हा अर्ज घरोघरी जाऊन दिला जाणार आहे. हा अर्ज या नागरिकांकडून भरून घेतला जाणार आहे. अर्जात संबंधित नागरिकांना घरातून मतदान करणार किंवा प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जाऊन मतदान करणार, याबाबतची माहिती घेतली जाईल. या अर्जांवर संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी निर्णय घेतील. या नागरिकांनी प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जाऊन मतदान केल्यास उर्वरित मतदारांना विशेत: तरुणांना त्यातून प्रोत्साहन मिळेल. मात्र, ज्या मतदारांना मतदान केंद्रावर जाऊन मतदान करता येत नाही, त्यांचे मतदान वाया जाऊ नये, म्हणून ही सुविधा सुरू केली आहे असे श्री देशपांडे यांनी सांगितले.

### ▸▸ मतदान केंद्रावर उमेदवाराची संपूर्ण माहिती

के वाय सीद्वारे ऑनलाईन आणि मतदान केंद्र परिसरात सर्वच राजकीय पक्षाच्या उमेदवाराची निवडणूक आयोगाला दिलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये दिलेली माहिती यामध्ये संपत्ती,गुन्हे व इतर माहिती फ्लेक्सच्या माध्यमातून लावण्यात येणार असून सर्व मतदारांना उमेदवाराची माहिती या माध्यमातून मिळणार आहे.

### ▸▸ विद्यार्थ्यांची स्वयंसेवक म्हणून होणार नेमणूक

आगामी निवडणुकीत निवडणूक आयोगाच्या वतीने अभिनव संकल्पना राबवत निवडणूक प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांना स्वयंसेवक म्हणून सहभागी करून घेण्यात येणार आहे.मतदान केंद्रावर त्यांना विविध बाबींसाठी स्वयंसेवक म्हणून कामाची संधी मिळणार आहे. तसेच मतमोजणीच्या ठिकाणी विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून स्वयंसेवक संधी दिली जाणार आहे. या सहभागाबाबत त्यांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.




### ▸▸ नागरिकांची घेणार मदत

CVIGIL या ॲपद्वारे नागरिकांना आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन यासारख्या घटनांची तक्रार करता येणार आहे. हे अप्लिकेशन मोबाईलवरून प्ले स्टोअर वरून डाऊनलोड करता येणार आहे.हे ॲप वापरून नागरिकांना थेट फोटो किंवा व्हिडिओ कॅप्चर करुन तक्रार करता येणार आहे.

### ठळक नोंदी

- संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर सायबर पोलिसांचे असणार लक्ष.
- बँका, पतसंस्था, को-ऑपरेटिव्ह संस्था यांना एका ठिकाणी दुसऱ्या ठिकाणी कॅश नेण्यासाठी क्यूआरकोडच्या माध्यमातून डॉक्युमेंट तयार ठेवावे लागणार आहेत. एकूण रोकड किती कोठे जाणार आहे याची संपूर्ण माहिती किंवा आर कोड च्या माध्यमातून उपलब्ध करून द्यावी लागणार आहे. तफावत असेल तर कारवाई होणार.
- प्रत्येक बँका पतसंस्था, को-ऑपरेटिव्ह संस्था यांना एसओपी प्रणालीद्वारे ट्रेनिंग.
- प्रत्येक वाहनांची कसून तपासणी.
- टी एस एम एस ऑनलाईन प्रणालीच्या २२ राज्यस्तरीय एजन्सी यंत्रणा निवडणूक प्रक्रियेवर लक्ष ठेवून असणार आहे.

### पक्ष देईल तो उमेदवार निवडून आणू

# ...पण स्थानिक बरा पडेल

✔ सुराज्य/खास प्रतिनिधी

'पक्ष देईल देईल तो उमेदवार निवडूण आणू, पण स्थानिक उमेदवार बरा पडेल, असा सूर खासदारांपासून ते मंडल अध्यक्षांपर्यंत सर्वांनीच आज गुरुवारी (ता.२९) केंद्रीय पक्ष निरीक्षक प्रदेश सरचिटणीस तथा पुण्याचे माजी महापौर मुरलीधर मोहोळ आणि सांगलीचे आमदार सुधीर गाडगीळ यांच्यापुढे सर्वानीच आळवला.

विशेषत्वे, सोलापूर लोकसभेचा उमेदवार निश्चित करण्याच्या पार्श्वभूमीवर, विद्यमान खासदांपासून ते सोलापुरातील मंडळ अध्यक्षांपर्यंत सर्वांशी 'मन की बात' झाली. सोलापुरातील एका हॉटेलमध्ये साधारण पाच-साडेपाच तास केंद्रीय निरीक्षकांनी मते स्वतंत्ररित्या जाणून घेतली.

साधारण एप्रिल महिन्यात लोकसभेच्या निवडणुका पार पडण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर, उमेदवार घोषित करण्याच्या अनुषंगाने, पडताळणी सुरु आहे. या अंतर्गत आज केंद्रीय निरीक्षक श्री मोहोळ आणि श्री गाडगीळ यांनी मते जाणून घेतली.

एसटी आरक्षीत असलेल्या सोलापूर लोकसभेची निवडणूक भाजपातर्फे लढविण्यासाठी इच्छुक असलेल्या काहीजणांनी आपले म्हणणे निरीक्षकांसमोर मांडल्याचे सांगण्यात आले.

(पान ३ वर...)



### ▸▸ भ्रमणध्वनीवर आमदारांशी 'मन की बात'

केंद्रीय निरीक्षकांच्या दौऱ्यादरम्यान आमदार विधीमंडाळच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तर काहीजण निरीक्षक म्हणून त्या त्या ठिकाणी उपस्थित होते. निरीक्षक मोहोळ आणि गाडगीळ यांनी विधीमंडळ अधिवेशनासाठी मुंबईत उपस्थित असलेल्या आमदार विजयकुमार देशमुख आणि समाधान अवताडे यांच्याशी चर्चा केली. तर नांदेडला केंद्रीय निरीक्षक म्हणून उपस्थित राहिलेल्या आमदार सुभाष देशमुख तसेच लातूरस्थळी निरीक्षकच म्हणून कर्तव्य पार पाडणारे आमदार तथा भाजपा जिल्हाध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी यांच्याशीदेखील फोनवर संवाद साधत मते जाणून घेतली.

### ▸▸ भाजपाच्या केंद्रीय निरीक्षकांसमोर आळवला सूर
### ▸▸ खासदारांपासून ते मंडलाध्यक्षांपर्यंत 'मन की बात'

### ▸▸ मतांचा डाटा प्रदेशाध्यक्षांकडे

संबंधितांनी व्यक्त केलेल्या मनोगतांच्या आधारे तयार झालेला अहवाल येत्या दोन दिवसात या निरीक्षकांकडून भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना सादर केला जाणार आहे. त्यांच्या अवलोकलानंतर हा अहवाल पुढे पार्लमेंटरी बोर्डपुढे सादर होईल, असे सांगण्यात आले.

# संघर्षयोद्धांची बंद दाराआड 'मन की बात'

## निरीक्षकांपुढे खासदार नाईक-निंबाळकर अन् धैर्यशील मोहिते-पाटील यांनी मांडला गृहपाठ

✔ सुराज्य/टेंभुर्णी

माढा लोकसभेचा भाजपाचा उमेदवार निवडण्याच्या पार्श्वभूमीवर,आज टेंभुर्णी येथे केंद्रीय निरीक्षक तथा केंद्रीय अर्थराज्यमंत्री भागवत कराड आणि आमदार प्रसाद लाड यांनी घेतलेल्या आढवा बैंठकीत या मतदार संघातून भाजपातर्फे निवडणुकीच्या आखाड्यात उतरण्यासाठी सज्ज असलेले उमेदवारींचे संघर्षयोध्दे विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर तसेच धैर्यशील मोहिते-पाटील यांनी बंद दाराआड निरीक्षकांसोबत 'मन की बात' करत आपणच येथील उमेदवारींचे प्रबळ दावेदार आहोत, हे पटवून देण्याचा प्रयत्न केला.



विशेषत्वे, श्री. नाईक-निंबाळकर आणि मोहिते-पाटील यांचा उमेदवारीचा दावा करताना गृहपाठ पक्का होता. याआधारे त्यांनी आपणच कसे सक्षम उमेदवार आहोत, हे सांगितले.

उल्लेखनीय बाब म्हणजे खासदारकीची पाच वर्षाची टर्म पूर्ण करत असताना मतदार संघात तब्बल एक लाख कोटींतून केलेली विकास कामे विशेषत: जलसिंचनाची आणि रस्त्यांचे प्रकल्प मार्गी लावण्यासह चौफेर विकास केल्याची जंत्रीच आवश्यक कागदपत्रांच्या पुराव्यासह खासदार नाईक-निंबाळकरांनी केंद्रीय निरीक्षाकांपुढे सादर केली. नाईक-निंबाळकरांच्या सादरीकरणाचा सकारात्मक प्रभाव केंद्रीय निरीक्षकांसमोर कितपत पडला, हे येत्या काही दिवसात कळू शकेल.

(पान ३ वर...)

### अकलूजच्या सिंहाची वेगळी भूमिका

२०१९ च्या माढा लोकसभेच्या मतदार संघातून फलणटच्या रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना माळशिरस तालुक्यातून मोठे मताधिक्य देत खासदारकीचे सिंहासन मिळवून देणाऱ्या अकलूजच्या रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी आज मात्र वेगळी भूमिका घेतली. निरीक्षकांसमोर आपले बंधू धैर्यशील मोहिते-पाटील यांना संधी देण्याबद्दल अभ्यासपूर्ण मत मांडले. धैर्यशील हे येथील उमेदवारीचे प्रबळ दावेदार कसे ठरु शकतात? हे पटवून देण्याचा प्रयत्न केल्याचे सांगण्यात आले.

### माढाची उमेदवारी अद्याप निश्चित नाही

माढा लोकसभेचा भाजपाचा उमेदवार निश्चित करण्याच्या अनुषंगाने, प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी केंद्रीय निरीक्षक तथा केंद्रीय अर्थराज्यमंत्री भागवत कराड आले होते. त्यावेळी त्यांना विचारले असता ते म्हणाले, माढा लोकसभेची उमेदवारी अद्याप निश्चित झालेली नाही. येथील उमेदवारीसंबंधी आम्ही आज सर्व संबंधितांची मते जाणून घेतली आहेत. या प्रतिक्रियांच्या आधारे प्रदेश भाजपाकडे अहवाल सादर होईल. तेथे या अहवालाचे प्रदेशाध्यक्ष यांच्याकडून अवलोकन करण्यात येईल. तद्नंतर हा अहवाल पार्लमेंटरी बोर्डाकडे जाईल. उमेदवारीचा निर्णय येथे होईल. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पार्लमेंटरी बोर्डाचे सदस्य आहेत.

# 'नमो'वरून पवार 'वॉर'

✔ पुणे/विशेष प्रतिनिधी

शरद पवार यांच्या बालेकिल्ल्यात मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्याच्या उपस्थितीत होणाऱ्या नमो रोजगार मेळाव्याचे निमंत्रण शरद पवार यांना पाठवण्यात आले नाही. मात्र, शरद पवार यांनी मेळाव्याला उपस्थित राहणार असल्याचे सांगून मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री फडणवीस यांना भोजनाचे निमंत्रण दिले. लोकसभा निवडणूकीपुर्वी प्रचाराची तोफ डागण्याचा प्रयत्न या निमित्ताने केला जाणार असल्याचे संकेत होते. मात्र, शरद पवार यांनी डावच उधळून लावल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे.



विद्या प्रतिष्ठान संकुलाच्या मैदानावर २ आणि ३ मार्चला या मेळाव्यासाठी स्थानिक खासदार सुप्रिया सुळे आणि बारामतीचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांना निमंत्रण मिळाले नसल्याची बातमी आज दिवसभर चर्चेत होती. सुळे यांना त्यांच्या पुण्यातील कार्यालयात निमंत्रण पत्रिका पाठविण्यात आली. शरद पवार यांना सायंकाळपर्यंत निमंत्रण दिलेले नव्हते. सुप्रिया सुळे यांनी निमंत्रण पत्रिकेचा फोटो सोशल मीडियावर टाकला आहे. त्यामध्ये त्यांचे नावही समाविष्ट करण्यात आलेले नसल्याचे दिसले. शरद पवार आणि बारामती असे समीकरणच आजवर दिसत होते.

देशाचे अनेक माजी राष्ट्रपती, माजी पंतप्रधान हे बारामती येथे येऊन गेले आहेत. कोणताही शासकीय कार्यक्रम असला तरी शरद पवार त्याचा भाग असतात. मात्र पहिल्यांदाच त्यांना एखाद्या शासकीय कार्यक्रमातून वगळण्यात आले आहे.

शरद पवार ज्या विद्या प्रतिष्ठान संस्थेचे अध्यक्ष आहेत, त्याच संस्थेच्या मैदानात सदर मेळावा संपन्न होणार आहे. संस्थेचे अध्यक्ष म्हणूनही शरद पवार यांना निमंत्रण दिलेले नाही, अशी माहिती आमदार रोहित पवार यांनी विधान भवनात माध्यमांशी बोलताना दिली.

(पान ३ वर...)

### शरद पवारांच्या संस्थेत कार्यक्रम याचा आनंद


सुप्रिया सुळे पुढे म्हणाल्या की, शरद पवार यांनी स्थापन केलेल्या आणि आजही तेच अध्यक्ष असेलल्या विद्या प्रतिष्ठान या संस्थेत हा कार्यक्रम होत आहे, याचा मला मनापासून आनंद वाटतो. पण शरद पवार यांना कार्यक्रमाचे निमंत्रण का दिले नाही? याचे उत्तर सरकारच देऊ शकते.

### शरद पवार प्रेक्षकांमध्ये बसणार!

आमदार रोहित पवार यांनी विधिमंडळात माध्यमांशी बोलत असताना सांगितले की, शरद पवारांना निमंत्रण मिळाले नसले तरी ते बारामतीकर म्हणून प्रेक्षकांमध्ये बसून हा कार्यक्रम पाहण्यासाठी तयार आहेत. तसेच त्यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि इतर मान्यवरांना गोविंदबागेतील घरी जेवणाचे निमंत्रणही दिले आहे. तसेच माझ्या संस्थेत येत आहात तर गेस्ट हाऊसवर चहासाठी या, असेही शरद पवार यांनी सांगितले आहे. त्यांची ही कृती शिष्टाचार नाकारणाऱ्या सरकारच्या डोळ्यात अंजन घालणारी आहे, अशी टीका रोहित पवार यांनी केली.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



दंड भरलाय, पण खांदा तसाच उरलाय!

# देशीदारूच्या 'मुळा'वर पोलिसांची धाड

## ▪ लाख रुपयांची २ हजार लीटर गुळामिश्रीत रसायन नष्ट

✔ सुराज्य/सोलापूर

तालुका पोलिस ठाण्याच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दि. २९ फेब्रुवारी रोजी हातभट्टी दारू तयार करणाऱ्या आरोपींवर ऑपरेशन परिवर्तनच्या अनुषंगाने कारवाई करण्यात आली. यावेळी पोलिसांनी १ लाख साडेचार हजार रूपये किंमतीचे २ हजार लिटर गुळमिश्रीत रसायन, १० प्लस्टिकच्या बॅरलसह नष्ट केले. व आरोपी नीलेश तोळराम पवार (रा. मुळेगांव तांडा) याच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.



तालुका दक्षिण सोलापूर येथील मुळेगांव तांडा येथे गेल्या अनेक वर्षापासून हातभट्टी दारू तयार करण्याच्या अनेक भट्ट्या तेथील लोक चालवितात. व मुळेगांव तांड्या वरील हातभट्टी दारू ही सोलापूरात व इतर खेडेगांव पोहोच केली जाते. याच मुळेगांव तांड्यावर राज्य उत्पादन शुल्क, शहर पोलिस व ग्रामीण पोलीसांनी मिळून अनेक वेळा धाडी टाकल्या. पण...मुळेगांव तांड्यावरील हातभट्टी दारू तयार करणाऱ्या भट्ट्या काही थांबल्या नाहीत.

मागील वर्षी तत्कालीन पोलिस अधिक्षक तेजस्विनी सातपुते यांनी ऑपरेशन परिवर्तन ही मोहिम राबविली. हातभट्टी दारू तयार करणाऱ्या पुरूष व महिलांसाठी वेगवेगळे उद्योग सुरू करून दिले.

(पान ३ वर...)

कल्याण
168-56-457

मुंबई
550-03-670

# लाचखोरीच्या 'महसुला'त पोलीसच अव्वल

✔ सुराज्य/सोलापूर

मागील वर्षी म्हणजे २०२३ मध्ये लाच खाण्यात महसूल खात्याला मागे टाकून पोलीस खाते लाच खाण्यात नंबर वन ठरले आहे. आत्तापर्यंत लाच खाण्यात महसूल खात्याचे कर्मचारी अडकलेले पहायला मिळालयचे. २०२३ मध्ये महसूल खात्याला मागे टाकून पोलिस खातेच अव्वल ठरले आहे.

शासकीय सेवेत काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना गलेलठ्ठ पगार असूनही हेच लालफितीचे कर्मचारी लाच खाण्यास व मागण्यास मागे-पुढे पहात नाहीत.

लाचलुचपत प्रतिबंध विभागाकडील २०२३ च्या आकडेवारी नुसार राज्य उत्पादन शुल्क विभागात लाच घेण्याचे दोन गुन्हे नोंदवण्यात आले. त्यात एकूण ३ आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तर पोलीस खात्यामध्ये लाच घेण्याचे एकूण ८ गुन्हे नोंदवण्यात आले. या मध्ये ११ जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. या मध्ये दोन मध्यस्थ आहेत. तर महसुल विभागात ६ केसेस करण्यात आल्या. यामध्ये १३ आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. यामध्ये ६ मध्यस्थ आहेत. अशा प्रकारे महसुल खात्याला मागे टाकून २०२३ मध्ये पोलिस खात्याने लाच खाण्यात नंबर वन पटकविला आहे. सोलापूर महानगरपालिकेतही एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच जिल्हा महिला बालकल्याण विभागात एक गुन्हा नोंदवण्यात आला. भुमि अभिलेख विभागात दोन गुन्हे दाखल करण्यात आले. तसेच जिल्हा सहकारी संख्येमध्ये एक केस करण्यात आली. यामध्ये एका आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

तर जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभागात दोन केसेस करण्यात आल्या. यामध्ये तीन आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. यामध्ये एक मध्यस्थ आहे. तसेच तीन खाजगी इसमांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. यामध्ये तिघांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. तर शिक्षण संस्थामध्ये एक केस करण्यात आली आहे.

### गेल्या वर्षात महसूलने नंबर गमावला! 'खाकी'चे ११ जण जेलमध्ये